पुराभिलेख संचालनालयातील अभिलेखांचे सुक्ष्मचित्रिकरण करण्यासाठीच्या खर्चास मंजुरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक-मपुवि-२०१७/प्र.क्र.७६/सां.का.२
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १५ फेब्रुवारी २०१८

वाचा : **१.** शासनाच्या समक्रमांकाचा दि. २७/०७/२०१७ चा शासन निर्णय.
२. शासनाचे समक्रमांकाचे दि. १३/१०/२०१७ चे पुरक पत्र.
३. संचालक, पुराभिलेख संचालनालय यांचे पत्र क्र. बा.सं.का. ९०/प्रतिचित्रण / सुक्ष्मचित्रकरण / पृ.स./२०१७/४२८२ दि. ११/१०/२०१७.
४. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क.७५/अर्थ-३ दि. ०६/०२/२०१८.

शासन निर्णय -

पुराभिलेख संचालनलायातील अभिलेखांचे सुक्ष्मचित्रिकरण व स्कॅनिंग करण्यासाठी अर्थसंकल्पात सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात रु.३,००,००,०००/-(अक्षरी रुपये तीन कोटी फक्त) इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. संचालक, पुराभिलेख संचालनालय यांनी संचालनालयातील अभिलेखांचे सुक्ष्मचित्रिकरण व स्कॅनिंग बाहेरील संस्थांकडून करुन घेण्याच्या अनुषंगाने ई-निविदा प्रकीया राबविली आहे. शासनाने संदर्भ क्र. १ येथील शासन निर्णयान्वये सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात पुराभिलेख संचालनालयातील अभिलेखांचे सुक्ष्मचित्रिकरण करण्यासाठी रु. १,०५,००,०००/- (अक्षरी रुपये एक कोटी पाच लाख फक्त) इतका खर्च करण्यास मान्यता दिली होती.

२. संचालक, पुराभिलेख संचालनालय यांनी अभिलेखांचे सुक्ष्मचित्रिकरणासाठी अतिरिक्त निधी देण्याबाबत संदर्भ क्र. ३ येथील पत्रान्वये प्रस्ताव सादर केला होता. वित्त विभागाने संदर्भ क्र. ४ येथील परिपत्रकान्वये कार्यक्रम खर्चासाठी खर्चाची मर्यादा ८०% इतकी विहीत केली आहे. अशा परिस्थितीत शासन पुराभिलेख संचालनालयातील अभिलेखांचे सुक्ष्मचित्रिकरण करण्यासाठी रु. ३०,००,०००/- (अक्षरी रुपये तीस लाख फक्त) इतका निधी खर्च करण्यास मान्यता देत आहे. सदर खर्च करण्यासाठी संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. त्यांनी वेळोवेळी याबाबतच्या कामाचा आढावा घेऊन आवश्यकतेप्रमाणे निधी वितरणाची कार्यवाही करावी.

३. या बाबतचा खर्च मागणी क्र. झेडडी-२,२२०५ कला व संस्कृती, (००) १०४, पुराभिलेख, (०१) (०३) पुराभिलेख कार्यालय (२२०५ १८०१) १३ कार्यालयीन खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात मंजूर करण्यात आलेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्तीय अधिकार नियक पुस्तिका १९७८ भाग पहिला, उप विभाग तीन अ.क्र. ४ परिच्छेद क्रं. २७ (२) तसेच वित्त विभाग परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि. १८ एप्रिल, २०१७ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२१५१३३२३९४१२३ आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Digitally signed by Anees Iqbal Ismail Shaikh
Date: 2018.02.15 13:43:58 +05'30'

(अनिस शेख)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. संचालक, पुराभिलेख संचालनालय, मुंबई.
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई.
३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
५. कार्यासन अधिकारी, (अर्थसं.) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. निवड नस्ती, सां.का.२.